महाराष्ट्र राज्यात वन वणवा आटोक्यात
आणण्याच्या आधुनिक पध्दती
२०१५-१६ या आर्थिक वर्षात अनुदान
उपलब्ध करुन देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र. एफडीसी-२०१५/प्र.क्र. १२३/फ-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ०३ फेब्रवारी, २०१६

पहा:- १) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर यांचे पत्र क्र.एफअे/आववप्रप्र/चालू योजना/२०१५-१६/५४० दि. ११ मे, २०१५.
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दि.१७/४/२०१५
३) शासन निर्णय क्रमांक एफडीसी-२०१५/प्र.क्र. १२३/फ-५, दि.१४ मे, २०१५.
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३ दि. १२ जानेवारी, २०१६

प्रस्तावना:-

भारत सरकार आणि अन्न व कृषि संघटना संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम योजनेव्दारे महाराष्ट्र राज्यातील वनवणवा आटोक्यात आणण्यासाठी व बहुमुल्य वनसंपदेचे अग्निपासून रक्षण करण्यासाठी आधुनिक वनवणवा प्रतिबंधक प्रकल्प १९८४ पासून राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र वन विकास महामंडळ हा प्रकल्प सन १९८४-८५ पासून शासनाचा अभिकर्ता म्हणून राबवित आहे.

या प्रकल्पांतर्गत वनाचे अग्निपासून आधुनिक पध्दतीने संरक्षण करण्यात येत असून मुख्यत्वेकरुन मोठया प्रमाणात लागवड केलेल्या साग रोपवनाचे रक्षण होत आहे. या प्रकल्पामुळे वनवणव्याच्या घटना व व्याप्ती यात लक्षणीय घट झाल्याचे दृष्टोत्पतीस येत आहे. योजनेचे महत्व व फलश्रुती विचारात घेता या प्रकल्पांतर्गत करावयाचे काम सन २०१५-१६ मध्ये चालू ठेवणे आवश्यक आहे.

शासन निर्णय:-

उपरोक्त पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्यातील वनवणवा आटोक्यात आणण्यासाठी व बहुमुल्य वनसंपदेचे अग्निपासून रक्षण करण्यासाठी आधुनिक वनवणवा प्रतिबंधक प्रकल्पांतर्गत सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी रु.२११.२१ लक्षची तरतुद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

सदरहू योजनेसाठी शासन निर्णय संदर्भ क्र.३ येथील दिनांक १४ मे, २०१५ नुसार रु.१४७.८४७ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

वित्त विभागाचे शासन परिपत्रक संदर्भ क्र. ४ येथील दि. १२ जानेवारी, २०१६ नुसार योजनेत्तर अर्थसंकल्पीत निधी पैकी ८५% वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन सदरहू योजनेसाठी ८५% निधीपैकी उर्वरीत निधी म्हणजे **(रु. १७९.५२८५ लक्ष - रु. १४७.८४७ लक्ष = ३१.६८१५ लक्ष**) रु. ३१.६८ लक्ष (रु. एकतीस लक्ष अडुसष्ठ हजार मात्र) इतका निधी वितरीत करण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

सदर खर्च सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये मागणी क्र. सी-७ प्रधानशिर्ष २४०६ वनीकरण व वन्यजीवन (योजनेतर) १९० सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रमांना सहाय्य (००) (०१) महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांस देय अभिकरण खर्च (२४०६ ०६६८) ५० इतर खर्च या शिर्षा अंतर्गत खर्ची टाकण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३ दिनांक १२ जानेवारी, २०१६ ला अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०४१२३९०३२८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

DHAS ANIL N

Digitally signed by DHAS ANIL N
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST,CID - 917247, postalCode=400032, st=Maharashtra, cn=DHAS ANIL N
Date: 2016.02.04 12:38:24 +05'30'

(अनिल धस)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर.
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित, नागपूर
४.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थ संकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. महालेखपाल (१ व २) (लेखापरिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
६. कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
७. कक्ष अधिकारी, (ब-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
८. कक्ष अधिकारी, (फ-२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
९. निवड नस्ती (फ-५), महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२